संत झेवियर्स महाविद्यालय

# पखरण

२०१५-१६

मराठी वाङ्मय मंडळ

स्थापना १९२३

## संत झेवियर्स महाविद्यालय

# प ख र ण

## २०१५-१६

## मराठी वाङ्मय मंडळ

स्थापना १९२३

संपादक

हर्षद पारेकर

सह संपादक

गार्गी देशमुख

अक्षर जुळवणी व सजावट


तेजस मयेकर

मुखपृष्ठ

ओरियान फर्नांडीस

# अनुक्रमणिका

मुख्य सचिवाच्या लेखणीतून........................................................
आठवणींच्या हिंदोळ्यावर........................................................
घर........................................................
आजही श्यामची आई हवी आहे........................................................
मैत्री........................................................
अन् मन त्या फटाक्यानं फाटलं!........................................................
साहित्य ते सिनेमा........................................................
सुरेल संवाद........................................................
वाट........................................................
बालपण हरवतंय........................................................
गोंडस गोष्टी........................................................
अनुभवाची शिदोरी........................................................
पावसाच्या सरी........................................................
शाळेतील छोटेखानी जग........................................................
पाऊल न वाजवता!........................................................
मोकळे व्हा एका दिवशी........................................................
झेवियर्सचा प्रवासः शोध स्वतःचा........................................................
प्रतिक्रिया........................................................
खोटं प्रेम........................................................
शिक्षण........................................................



## मुख्य सचिवाच्या लेखणीतून

# १

## राजस शिंदे

नमस्कार वाचकहो,

झेवियर्स महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळ आहे हे कळताच प्रथम व   र्षात मी मंडळाचा सभासद झालो. मार्केटिंग विभागामध्ये एक मेंबर म्हणून सुरू झालेला माझा हा प्रवास मंडळाच्या '९२व्या व   र्षाचा मुख्य सचिव' इथपर्यंत कधी येऊन पोहोचला कळलंच नाही. ह्या आमच्या मराठी वाङ्मय मंडळाची ओढच इतकी न्यारी आहे, एकदा का मंडळात सामील झालात की ह्या मंडळींच्या आपुलकीने तुम्ही कायमस्वरूपी ह्या कुटुंबाचा भाग होऊन जाता. तसंच हे कुटुंब माझ्याही झेवियराईट लाईफचा एक अविभाज्य घटक होऊन गेलं आहे.

मुंबई विद्यापीठामधील सर्वात जुने मराठी वाङ्मय मंडळ अशी ख्याती असलेल्या संत झेवियर्स महाविद्यालयाच्या 'मराठी वाङ्मय मंडळा'ची स्थापना १९२३ साली झाली. पाश्चिमात्त्य संस्कृतीचा पगडा असणाऱ्या झेवियर्समध्ये मराठी संस्कृतीची ज्योत अखंड तेवत ठेवण्याचं काम हे आमचं मंडळ करत असतं. महाविद्यालयातील मराठी भाषिक युवकांमध्ये मराठी भा   षेची गोडी वाढावी आणि त्यांच्या कलागुणांना मातृभा   षेमध्ये सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळावं; तसंच अमराठी भाषिक युवकांना या महारा   ष   ट्राच्या समृद्ध संस्कृतीची, परंपरेची ओळख व्हावी यासाठी आमची मंडळी कार्यरत असतात.

१९२३ साली स्थापन झालेल्या या मंडळाचा सगळा इतिहास जरी ज्ञात नसला तरी प्रत्येक व   र्षी विविध, नवीन उपक्रम करून आम्ही एक नवा इतिहासच जणू रचत असतो. ह्या ९२व्या व   र्षात मंडळाने अभूतपूर्व असे २ उपक्रम राबवले. एक म्हणजे यंदाच्या व   र्षात झेवियर्समध्ये प्रथमच 'गुरुपौर्णिमा' साजरी करून, गुरुजनांचे आशीर्वाद मिळवत मंडळाने व   र्षाची सुरुवात केली. तसंच झेवियर्सच्या इतिहासामध्ये प्रथमच ह्या व   र्षी मराठी वाङ्मय मंडळ आणि Dept. of Inter-Religious Studies यांच्या एकत्रित उपक्रमातून कॅम्पसमध्ये 'गणपती बाप्पाची' स्थापना करण्यात आली. त्याचबरोबर ईद साजरी करून धार्मिक संदेश देण्यात आले. दरव   र्षी झेवियर्समध्ये साजरा होणाऱ्या 'ट्रेडीशनल डे'चं यंदाचं विशेष आकर्षण होतं मंडळातर्फे सादर केलेलं लेझीम.

'आमोद' हा मंडळाचा आंतरमहाविद्यालयीन वार्षिक सोहळा असून यात झेवियर्स सह इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आपल्या विविध कलागुणांच्या सादरीकरणासाठी व्यासपीठ मिळतं व मंडळाकडून मराठी संस्कृती जोपासण्याचा प्रयत्न केला जातो.

'पखरण' हा आमचा वार्षिक अंक म्हणजे आम्हा सर्वांच्याच जिव्हाळ्याचा वि   षय. यात झेवियर्सच्या विद्यार्थ्यांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांना आपले विचार, लेख, कविता मांडण्याची संधी मिळते.

अशा या मराठी वाङ्मय मंडळाच्या ९२ व   र्षांच्या परंपरेचा मी भाग आहे, हे मी माझं भाग्य समजतो. आजच्या तरुणाईत आपली मराठी संस्कृती टिकून ठेवण्यासाठी थोडाफार हातभार लावू शकलो याचा मला अभिमान आहे. मंडळाच्या प्रगतीसाठी आमची सर्व कार्यकारिणी व   र्षभर खूप मेहनत घेत असते आणि या कामातून आम्हा सर्वांना केवळ समाधानच नाही तर आयुष्यातील विविध टप्प्यांमध्ये येणाऱ्या समस्यांचा सामना करण्याची रंगीत तालीम घडते.

असं हे आमचं मंडळ उत्तरोत्तर प्रगती करो हीच माझी सदिच्छा! हा पखरण अंक तुम्हा वाचकांना नक्की आवडेल अशी आशा.

जय महारा   ष   ट्र!

# आठवणींच्या हिंदोळ्यावर

## २

गार्गी देशमुख

आयुष्याच्या पहाटेपासून सूर्य उगवून, चमकून, दिशा दाखवून दमतो, थकतो, तरी मदत करतच राहतो. वाट दाखवतच जातो. दुसऱ्याच्या सूर्याचा उषःकाल घडवत राहतो. आणखी प्रखर, तेजस्वी सूर्य तयार करत राहतो. प्रकाश पसरवण्याचं काम सुरुच ठेवतो. अगदी मावळेपर्यंत.

आणि अखेर आपली मशाल दुसऱ्या कणखर हातांमधे सोपवून मावळतो, अखेरचा शांत स्तब्ध होतो. आकाशातील तेज कमी करतो आणि अखेर रात्र होते. रात्रीच्या घनघोर अंधारतही लख्ख चमकणारा एखादा तारा त्या सुर्याची आठवण करत राहतो आणि कळतं की सूर्य गेला तरी त्याचे तेज आपल्याबरोबर राहील, कायम.

असेच काही तेजोमय सूर्य याही व   र्षी मावळले. पण आपल्या तेजाचा आणि प्रकाशाचा वारसा मागे ठेवून.

१९९१-९३ मध्ये वैज्ञानिक सल्लागार आणि ISRO चे chairman असलेले डॉ.वसंत गोवारीकर यांना पद्मभूषण आणि पद्मश्रीने गौरविण्यात आले होते. भारतीय मान्सूनचा सखोल अभ्यास करून भारतीय हवामानाचा अचूक अंदाज बांधणारे पहिले मॅ्डेएल बनविण्याचा मान त्यांच्याकडे आहे. ते जरी आता आपल्यात नसले तरी आपल्या देशातल्या तमाम मान्सूनच्या संशोधनाचे आधारस्तंभ तेच राहतील.

म. द. हातकणंगळेकर हे मराठीतील प्रसिद्ध समीक्षक, लेखक, अनुवादक होते. जानेवारी २०१५ मध्ये त्यांचे दुःखद निधन झाले. ते अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. ते सांगली येथे विलिंडन महाविद्यालयाचे प्राध्यापक आणि मुख्याध्यापकही होते. त्यांनी मराठीत खूप पुस्तके लिहिली आहेत आणि मराठीतून इंग्रजीमध्ये अनुवादही केले आहेत. महारा   ष   ट्रातील साहित्य संस्थांबरोबर त्यांचा अविरत संपर्क होता.

मूळच्या कर्नाटकच्या असलेल्या पण मराठी संगीत क्षेत्रात मोलाचे योगदान दिलेलेल्या कृष्णा कल्ले यांचे मार्च २०१५ मध्ये निधन झाले. त्यांनी जवळपास २०० हिंदी व १०० मराठी गाणी गायली असून त्यांना २०१४ मध्ये लता मंगेशकर जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आपल्या देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम आपल्याला जुलै २०१५  मधे सोडून गेले. कलाम हे एक उत्तम शिक्षक होते आणि गेली ४० व   र्ष DRDO,ISRO या संस्थांमधे संशोधक म्हणून काम करत होते. भारताच्या क्षेपणास्त्र आणि अंतराळ मोहीमेच्या सफल वाटचालीमधे त्यांचा मोलाचा वाटा होता. ते नेहमीच विद्यार्थ्यांच्या विकासासाठी झटत. त्यांनी अग्निपंख आणि Ignited Minds सारखी प्रेरणादायी पुस्तके लिहिली आणि तरुणाई त्यांनी दाखविलेल्या वाटेवरुन प्रेरणा घेऊन वाटचाल करत आहे.

भालचंद्र पेंढारकर हे रंगकर्मी, गायक, निर्माते होते. सर्व रसिकांचे ‘अण्णा’, हे ऑगस्ट २०१५ मध्ये आपल्या सगळ्यांना सोडून गेले. ‘दुरितांचे तिमीर जावो’, सत्तेचे गुलाम या नाटकातून ते ओळखले जात व त्यांनी ३०० पेक्षा जास्त हिंदी व मराठी नाटके केली होती. त्यांना बालगंधर्व पुरस्काराने १९८३ मधे गौरविण्यात आले होते. ‘कोसला’ या कादंबरीसाठी साहित्य क्षेत्रात प्रति   ष्ठेचा असलेला ज्ञानपीठ पुरस्कारही मिळाला.

त्यांच्या काळात असलेले एकमेव मराठी क्रिकेट समालोचक बाळ पंडितही आपल्याला सप्टेंबरमधे सोडून गेले. ते क्रिकेटपटूच नव्हते तर त्यांनी त्या खेळावि   षयीची पुस्तकेही लिहीली आहेत. तब्बल ४० व   र्ष समालोचन केल्यामुळे त्याची नोंद ‘लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड ’ मधेही नोंदविले गेले. त्यांना त्यांच्या क्रिडाक्षेत्रातल्या योगदानासाठी १९७८ मधे शिव छत्रपती पुरस्काराने गौरविण्यात आले होते.

बालगीते, प्रेम कविता, सामाजिक-राजकीय लेखन करणारे, सर्वांचे आवडते आणि २०१३ मध्ये पद्मभूषण मिळालेले मंगेश पाडगावकर त्यांच्या सुरेल आणि सुरेख कवितांचा खजिना खुला करून डिसेंबर २०१५ मध्ये स्वर्गवासी झाले. असंख्य पुस्तकांचा अनुवाद त्यांनी केला होता आणि ७० वर्षांच्या कारकिर्दीत त्यांची ४० पुस्तके प्रकाशित झली आहेत.

या सर्वांच्या मार्गदर्शनाने प्रकाशलेल्या वाटेवर वाटचाल करत त्यांच्यानंतरची पिढीही हे जग सुंदर करण्यात आपलं योगदान देत आहे.

# घर

## ३

कश्मिरा सावंत

एस. वाय्. जे. सी., कला

"मला घरी जायचंय." अंश पुन्हा पुटपुटला.

"ईशाकडे जायचंय."

प्रियाने त्याच्या कपाळावर कापडाची ओली पट्टी ठेवली नि मायेने त्याच्या केसांवरून हात फिरवला. तापाने फणफणलेलं आपलं १० वर्षांचं लेकरू घरी जाण्याबद्दल झोपेतसुद्धा सतत बडबडतंय, हे तिला बघवत नव्हतं. पण ती तरी काय करू शकणार होती? आपण इथे येऊन चूक तर नाही ना केली, हा विचार पुन्हा पुन्हा मनात घोळवत ती अंशसाठी सूप बनवायला किचनमध्ये गेली. त्याक्षणीच दाराची बेल वाजली.

"थँक गॉड यू कुड कम अर्ली टुडे, अंकुश!"

अंकुशला सद्यस्थितीची कल्पना देताना प्रियाच्या डोळ्यांत पाणी आलं. ते स्वाभाविकच होतं म्हणा. नवीन घर, नवं वातावरण अंश पटकन् ॲक्सेप्ट करणार नाही याची तिला कल्पना होती. पण त्याला ताप येण्याइतका त्रास होईल, हे तिला अजिबात वाटलं नव्हतं. अंशचा ईशावर खूप जीव होता. ईशाचा जन्म झाल्यावर जेव्हा तिला अंशचे काकाकाकी घरी घेऊन आले, तेव्हा अंश ५ वर्षांचा होता. त्यावेळी त्याला फार नवल वाटलं होतं, पण थोडीशी जेलसीही होतीच. हळूहळू दोघांनाही एकमेकांची सवय झाली. छान गट्टी जमली. ईशाही जसजशी मस्ती करण्याच्या वयाची झाली, तसतशी या दोघांची एक सॉलिड टीम तयार झाली. दोघं मिळून अगदी धुमाकूळ घालायचे घरात... 'घरात'!

"प्रिया, तू टेंशन नको घेऊस गं."

प्रियाचा चेहरा पाहूनच अंकुशला तिच्या डोक्यात काय चाललंय हे कळलं असावं. त्याने तिला सोफ्यावर बसवलं, अंशच्या खोलीचं दार अलगद बंद करून घेतलं आणि तोही तिच्या शेजारी जाऊन बसला.

"त्याला पुन्हा ताप आलाय अरे!"

"हो राणी, हो. तू आधी शांत हो. हे बघ, अंशला थोडा वेळ दे. त्याला या बदलाशी जुळवून घ्यायला वेळ लागेलच ना?"

"बट अंकुश, ही हॅज् फॉलन सिक!"

"अगं"

"डोंट यू सी? त्याला आपलं दादावहिनींपसून विभक्त होणं सहन होत नाहीये!"

"तो लहान आहे, प्रिया. थोडा वेळ गेल्यावर तो अड्जस्ट होईल." त्याने समजावण्याचा प्रयत्न केला.

"मला नाही तसं वाटत." ती म्हणाली. "दोन दिवसांपासून त्याचा ताप येऊन जाऊन आहे. डॉक्टर म्हणालेत हे मानसिक आहे. तुला कळत कसं नाही, अंकुश? आपल्या भांडणात आपण लहानांची ओढाताण करायची का?"

"प्लीज डोंट गेट मी स्टार्टेड अगेन. आपलं एकदा ठरलंय ना? दादाच्या पत्त्यांच्या बंगल्यात राहण्याची माझी अजिबात इच्छा नाहीये. तत्त्वांना मी बाजूला सारू शकत नाही." अंकुश सरळ उठला नि अंशच्या खोलीत गेला.

प्रिया संतापली. 'याला कळत कसं नाही?' ती मनातल्या मनात स्वतःशीच बोलू लागली. 'बाबा होते तोवर राहतच होतो ना त्या महालात? पिल्लूसाठी जरा तत्त्व बाजूला ठेऊन तिथे राहिलो असतो तर काय बिघडलं असतं? आपल्या वादात बिचारे ईशा नि अंश नको एकमेकांपासून दुरावायला.' पण थोड्या वेळात तिचंच मन तिला समजावू

लागलं. 'कोणाला आवडलं असतं सतत दडपणाखाली जगायला? पैशांची हाव एक ना एक दिवस महागात पडेल, हे समजावूनही दादा काही ऐकायचे नाहीत. टॅक्स चुकवणं, लाच घेणं, सगळे काळे धंदे बाबा असेपर्यंत लपून छपून चालायचे. बाबा गेल्यानंतर मात्र अंकुश नि दादांमध्ये सतत वाद. अंकुश तरी किती म्हणून आपल्या तत्त्वांशी तडजोड करणार होता? बाबांना काही त्रास होऊ नये यासाठी तो माझं ऐकून दादांशी त्यांच्या समोरतरी वाद घालणं टाळायचा. पण त्याची सहनशक्ती अखेर संपणारच होती ना.'
संपूर्ण गतकाळ तिच्या डोळ्यांसमोरून गेला, आणि तिला वाईट वाटलं. अंकुश बद्दल प्रेम आणि आदरही मनात दाटून आला. 'कसं बोलले मी आज अंकुशशी!' डोळ्यांत अश्रू आले. 'दोघं सख्खे भाऊ, पण किती फरक! मोठा अगदी तत्त्वनि ष्ठ, धाकटा नेमका याउलट.'

दीड तासाने अंकुश नेहमीसारखा एनर्जेटिकली बाहेर आला. प्रियाला आश्चर्य वाटलं. थोड्याच वेळात अंशही हळूहळू चालत बाहेर आला. पूर्णपणे पूर्ववत नसला तरी आता त्याच्या चेहऱ्यावर स्मितहास्य होतं.

पुढील दोन दिवसातच अंशची तब्बेत सुधारली, फिजिकली आणि मेंटलीही. त्याने आपल्या नव्या घराला 'घर' म्हणून स्वीकारलंही. अर्थातच, जुन्या घरी जाण्याचा हट्टही त्याने सोडून दिला. अंकुशने त्याच्या 'चॅम्प' बरोबर घालवलेल्या त्या 'क्वॉलिटी टाइम'ने किमयाच केली.
आपल्या पिलाला सोसायटीतील मुलांबरोबर खेळताना पाहत प्रिया आणि अंकुश एके संध्याकाळी बाल्कनीत उभे होते. प्रियाच्या चेहऱ्यावर समाधान होतं. अंकुश मात्र वेगळाच विचार करत होता. 'ईशासाठी घरात गर्दी नको म्हणून आपण दुसऱ्या घरी आलो, असं सांगितल्यावर अंशने 'घरी' जाण्याचा हट्ट सोडला. जसं अंशने आता समजून घेतलं, तसंच पुढे खरं कारण कळल्यावरही तो समजून घेईल, माझी खात्री आहे. पण ईशा? ती मोठी झाल्यावर समजून घेईल?' अंकुशची काळजी रास्त होती. अंश आणि ईशाच्या नात्यावर आम्हा पालकांमधील मतभेदांचा परिणाम होणं अटळ आहे, हे अंकुशने ओळखलं होतं.

# आजही श्यामची आई हवी आहे

४

ऐश्वर्या माने,
द्वितीय वर्ष, बी.एम्.एम्.

"धग ऊन्हाची सोसून, माय रानात राबती
घाम निथळतो तिचा, धन्य धन्य होई माती
काटा पायात रुततो, येते डोळ्यामधी पाणी
रक्त आटवून सारे, माय राबते अनवाणी
खाते कोरकुटका घाई घाई, नाही आराम घटकाभर
तळहात फोडाचे माहेरघर, ठिगळाचं लुगडं अंगावर
थकल्याली माय, गोड अभंगात रंगते
काळजातलं दुःख जणू पांडुरंगाला सांगते
आम्हा लेकरांच्या भल्यासाठी तिनं सारी जिंदगी वाहिली
जीव जाळून जाळून माय झाली जन्माची सावली."

अशा या आईची थोरवी घरट्यात चिवचिवणाऱ्या चिमुकल्या पिलापासून आईचा हळुवार मायेचा स्पर्श ओळखणाऱ्या तान्हुल्यापर्यंत प्रत्येक जण जाणत असतो. 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' या पंक्तीतून पृथ्वीतलावरील आईचे महत्त्व स्प ष ट झाल्यावाचून राहत नाही.

परंतु आजच्या युगातील तरुणवर्गाला, पिढीला, 'स्वामी तिन्ही जगाचा मायेविना भिकारी' असेच वाटते. याठिकाणी 'माया' म्हणजे प्रेम, ममता नव्हे तर हातातील छनछन करणारी माया, अर्थात, पैसा आहे. आणि पैशाच्या मागे धावणाऱ्या या लोकांना फेसबूक, व्हॉट्सॅप, इन्स्टा शिवाय स्वतःच्या मायसाठी द्यायलाही वेळ नाही. मग श्यामच्या आईच्या आठवणींना उजाळा द्यायला कुठला वेळ मिळणार, नाही का?

अगदी खरंच आहे ना! ६.०५ किंवा ७.१३ ची लोकल गाठणारा कामकरी पैशाच्या मागे धावत सुटतो, आपल्या संसाराची फाटकी गोधडी शिवण्यासाठी; पण तरीही पाय उघडे ते उघडेच पडतात. कुठे कुठे मग ठिगळं लावायची, हाच प्रश्न आ वासून पुढे उभा राहतो.

आपल्या श्यामला आयुष्यात कुणी भित्रा भागुबाई असे हिणवू नये, यासाठी प्रसंगी छडीने चोप देणारी अन् पाठीवरील वळ पाहून हेलावणाऱ्या ह्दयाने ओली हळद पाठीला लावणारी आई कुठे? हाच प्रश्न चिमुकल्यांना पडेल, कारण संसाराचा गाडा पुढे रेटण्यासाठी नेटाने पुढे होऊन दुसरे चाक होणारी आजची आईधावत पळत पाळणाघरात पोहोचते आणि कामावरून सुटल्यानंतर पेंगुळलेल्या आणि आईची वाट पाहून थकलेल्या बाळाला घरी आणण्यापुरताच तिला वेळ मिळतो. मग बाकीचे संस्कार देणे, चांगल्या सोकॉल्ड सवयी लावण्यासाठी असतातच ना बालसंस्कारवर्ग. तिथे सगळे रेडीमेड शिकवले जाते, अगदी आयत्या कपड्यांसारखे. योग्य अयोग्याचा विचार करायला वेळ आहे का कुणाला? मग दिवस मावळल्यावर देवापुढे दिवा लावून शुभं करोति म्हणावी, मोठ्यांना नमस्कार करावा हे सांगणार कोण आणि कोणाला?

आपल्या श्यामला मडक्यातील घट्ट दही आवडतं हे अगदी जाणीवपूर्वक लक्षात ठेवून त्याच्यासाठी घट्ट दही राखून ठेवणारी आई, आज कुठे आहे?

लहान अंकुराला जर प्रेमाने वाढवले तर तो मोठा होतो आणि हजारोंना प्रेम देतो. ही सर्व धुळाक्षरे श्यामने आईभोवती रांगता रांगता खेळतच शिकली. आजच्या श्यामलादेखील याच बाळकडूची गरज आहे. परंतु आजची समाजस्थिती, कुटुंबपद्धत ही आजच्या पिढीला बाळकडू देण्यासाठी उणीच पडली आहे असे वाटते. कारण राजाराणीचा संसार थाटलेला असताना एकत्र कुटुंबपद्धतीचे फायदे फक्त पुस्तकात किंवा निबंधात लिहिण्यापुरतेच मर्यादित राहतात.

म्हणूनच या पैशाच्या तालावर थिरकणाऱ्या अजब दुनियेला चांगला धडा शिकवण्यासाठी आणि आपल्या बाळांमध्ये मनाचा संयम राखून 'मोठा झालास तरी गुणी हो' या थोर शब्दांचा मान राखण्याचे कसब आणण्यासाठी चमत्कार घडवणारी अशी श्यामची आई हवी आहे.

गाईगुरांवर, फुलपाखरांवर, झाडामाडांवर
प्रेम करायला शिकवणारी,
कोंड्याचा मांडा करून कसा खावा,
अन् अगदी गरीबीतही आपले सत्व
आणि स्वत्व न गमावता कसे राहावे
ही थोर शिकवण देणारी
ममतेची जणू गंगोत्रीच
आज घरोघरी अवतरणे अपेक्षित आहे.

कारण आजही श्यामची आईच हवी आहे; पुन्हा एकदा श्याम घडवण्यासाठी!

# मैत्री

५

प्रांजली दिवेकर
द्वितीय वर्ष, विज्ञान

मैत्रीची व्याख्या करताच येत नाही
तिचा अर्थ शब्दांमधे मावतच नाही
मैत्री म्हणजे असते आयुष्याची शान
तिच्यासाठी कधी कधी दूर सारावा अभिमान
मैत्रीमधे लागतो विश्वाचा पाया
असावी लागते दुसऱ्यावर अपार माया
मैत्रीसाठी आयुष्य झोकून द्यावं लागतं
मैत्रीचं वेड मनामनात भिनतं
भांडण, दुःख, अबोला हे ही येतं पाठी
यातच खरी असते मैत्रीची कसोटी
मैत्रीचा आधार आयुष्यभर पुरतो
म्हणून तर आपण आनंदाने जगतो

# अन् मन त्या फटाक्यानं फाटलं!

६

वसुधा देशमुख

आज लक्ष्मीपूजन, त्यामुळे फटाके म्हणजे प्रत्येक सेकंदाच्या ठोक्याला एक असे! अशात मी संध्याकाळी एका कामाला बाहेर पडले पूजा झाल्यावर. खाली आले तर पेवरब्लॉक कमी आणि रांगोळी, फटाकेच जास्त दिसत होते. विझलेले अनार, भुईचक्र, आणि बॉम्ब आणि माळा जिकडे तिकडे दिसत होते. चालता चालता रस्त्यावरचे ते लालपांढरे कागद, बाईक गेल्यामुळे सैरावैरा उडू लागले आणि सांगून खोटं वाटेल पण त्या कागदाच्या कपट्यांची पण भीती वाटू लागली! खरं तर मला फटाक्यांची भीती अजिबात वाटत नाही असा विचार करतानाच, अगदी कानाजवळ कोणीतरी एक बॉम्ब फोडला उगाच आगाऊपणा करण्यासाठी. मी तर झापणारच होते त्या मुलाला पण त्या आवाजाच्या धक्क्यातून सावरेपर्यंत मी खूप पुढे आले.

काम झालं आणि घरी जायला मागे वळले. येताना एक फुसका बॉम्ब कोणीतरी भर रस्त्यात लावला होता. आणि तो आता फुटतो का नंतर असा विचार करत लोकं घोळक्याने उभी होती. बॉम्ब लावून तो माणूस तर निघून गेला पण वेळ मात्र इतरांचा वाया गेला. फटाक्यांचा तिरस्कार मला खूप आधिपासूनच आहे, पण आज अगदीच गलबलले मी. षेत असताना बुचाच्या झाडाखाली फुलं पडली होती. ती उचलताना एका फुलाकडे लक्ष गेलं आणि माझं मनच हरलं. भाहेरच्या व्यवहारीक आणि वैज्ञानिक भव्य विश्वाशी या गोष टीचा संबंध नाही त्यामुळे या गोष टीचा खऱ्या खुऱ्या जीवनात काही मोल नाही. पण त्या फुलाच्या मधोमध फुटलेल्या बॉम्बमुळे त्याच्या पाकळ्यांना पडलेली छिद्र, माझ्या मनाला पडल्याचा मला भास झाला अन् माझं मनच फाटलं.

# साहित्य ते सिनेमा

## ७

प्रा. प्रितेश अर्ते
बी. एम. एस. विभाग

मराठी चित्रपट अलीकडे प्रेक्षकांना चांगलीच भुरळ घालत आहेत. सुंदर कलाकृती व आशयाची योग्य निकड असलेल्या कथांबरोबरच उत्तम अभिनय यांमुळे आताचे चित्रपट प्रेक्षकांना आकर्षित करत आहेत. याला दिग्दर्शकाचे कौशल्य तसेच चाणाक्ष मार्केटिंगसुद्धा तेवढंच कारणीभूत आहे.

सुंदर कथेसाठी मराठी दिग्दर्शक सतत उत्तम साहित्याच्या शोधात असतात आणि मराठी साहित्य हे त्यांच्यासाठी जणू हिऱ्यांचीच खाण आहे असे म्हणणे अतिशयोक्ती नाही. मागील दोन व  र्षांमधे बरेच मराठी चित्रपट यशस्वी झाले आहेत. यात 'दुनियादारी', 'क्लासमेट' ह्या महाविद्यालयीन जीवनावर आधारीत असलेल्या चित्रपटांचा उल्लेख झाल्यावाचून राहत नाही. 'दुनियादारी' या चित्रपटाची कथा 'दुनियादारी' या सुहास शिरवाळकर यांच्या कादंबरीवरून घेण्यात आली होती. या चित्रपटाचे सादरीकरण इतके सुंदर होते की विशीपासून साठीपर्यंत सर्वांनी या चित्रपटाला स्वत:शी कनेक्ट केलं. याच बरोबर 'शाळा' या मिलींद बोकील यांच्या 'शाळा' कादंबरीवरून घेतलेल्या चित्रपटानेही प्रेक्षकांच्या मनावर छाप पाडली.

२०१५ च्या अखेरीस आलेला 'कट्यार काळजात घुसली' हा सिनेमा तरुणांमधे इतका गाजला की 'संगीतनाट्य आताच्या तरुणांना आवडते' हे पाहून दिग्दर्शक सुबोध भावे याला आश्चर्याचा सुखद धक्का नक्कीच बसला असेल. या चित्रपटातील शंकर-एहसान-लॉय यांचे संगीत भारावून टाकणारे होते. नाटकामधील गाणी आणि त्या गाण्यांचा चित्रपटातील प्रयोग फारच सुंदर होता. हिंदी भा  षेतील गाणी गाणारा गायक अरजीत सिंग या गायकानेही 'कट्यार' मधील गायलेले गाणे फारच श्रवणीय होते. असा हा सिनेमा १९६७ साली आलेल्या नाटकाचे चित्रपटात केलेले रूपांतर असून याला प्रेक्षकांनी आजही मोठ्या प्रमाणात पसंती दाखवण्याचे एकमेव कारण म्हणजे या कथेतील चीर तारुण्य!

वि. वा. शिरवाडकर यांचे 'नटसम्राट' हे नाटक प्रचंड गाजले आणि त्याच नाटकावर आधारीत महेश मांजरेकर दिग्दर्शित 'नटसम्राट' हा चित्रपट नवीन व  र्षाचा योग साधून आला. या चित्रपटाने प्रेक्षकांची वाहवा लुटली. नाना पाटेकर यांनी 'आप्पा बेलवलकर' असा काही रंगवला की चित्रपटातील संवादांनी टाळ्या घेतल्या.

या सर्व चित्रपटांचा उल्लेख करण्यामागे एकच उद्देश आहे - 'मराठी साहित्य हे सखोल व उत्तम आहे'. मराठी साहित्याची प्रगल्भता आता चित्रपटांच्या माधमातून पुन्हा सुस्प  ष  ट होत आहे. जिथे हिंदीमधे कथा नसलेले, आशय नसलेले काही चित्रपट येत आहेत त्याच वेळेस मराठी साहित्यावर आधारित चित्रपट केवळ मराठीच नव्हे तर अमराठी प्रेक्षकांनाही सिनेमागृहात खेचत आहेत.

मराठी चित्रपटकार जर अशाच दर्जाचे चित्रपट काढत राहिले तर तो दिवस दूर नाही जेव्हा 'दिल्लीचेही तख्त राखतो महारा  ष  ट्र माझा !' असे पुन्हा गाता येईल.



# सुरेल संवाद

८

**प्रश्न : तुम्हाला संगीताची आवड कशी लागली आणि त्या संदर्भात शिक्षण कुठे सुरू झालं?**

अश्विनीताई : घरातील संस्कारांमुळे मला संगीताची आवड लागली. माझं शिक्षण घरीच झालं. पण ते आईकडे नव्हे तर 'नारायणराव दातार' यांच्याकडे. आम्ही त्यांना मास्तरच म्हणायचो. मी लहान असताना मास्तर संगीत शिकवायला घरी यायचे. त्यावेळी गुरूने घरी येऊन शिकवणी देण्याची पद्धत होती. आमचं एकत्र कुटुंब असल्याने वडीलांची आई, वडील, दोन आत्या; एकंदर सगळेच त्यांच्याकडे शिकायचे. तसं घरात सांगितीक वातावरण असायचं आणि दररोज सगळ्यांचा रियाझ चालायचा. त्यातून तो एक संस्कार मिळाला. सर्वजण तन्मयतेने रियाझ करायचे व फक्त एखादा सोहळा आहे म्हणून नव्हे तर चांगली सवय म्हणून रियाझ व्हायचा. रियाझ हा जीवनशैलीचा एक भाग होऊन गेला. आम्हाला करिअर करायचं म्हणूनच संगीत शिकायचं व रियाझ करायचा अशी शिकवणच नव्हती.

**प्रश्न : BSc, MSc आणि मग PhD असा प्रवास होत असताना तुम्ही गाण्याचा आणि अभ्यासाचा संगम कसा साधलात?**

अश्विनीताई : रियाझ करणं माझ्या जीवनशैलीचा एक अविभाज्य भाग झाल्याने गाण्याचा व अभ्यासाचा संगम आपोआप साधला जायचा. रियाझ ही नुसती शारिरीक कृती नसून त्याला बौद्धिक जोड आवश्यक असते. त्यामुळे रियाझ करताना बाकीची कामं थोडी बाजूला सारून रियाझामध्ये स्वतःला झोकून द्यावं लागतं. रियाझ हा एक प्रकारचा व्यायाम आहे. जेव्हा मी रियाझाला बसत असे तेव्हा जे काही काम असेल वा संशोधनाचे विचार असतील यातून मी स्वतःला बाहेर काढून तंबोऱ्यात व रागात एकरूप होऊ शकत होते. हे सरावानेच जमतं. ज्यावेळी संशोधनासाठी प्रयोगशाळेत असायचे व नुसतं मेकॅनिकल काम, जसं सेन्ट्रीफ्यूजला ठेवणं इ., असायचं तेव्हा रूममध्ये एकटी असल्याने मी माझा रियाझ करत. रियाझ म्हणजे एका जागेवर तंबोरा घेऊन बसल्यावरच होतो असं नाही. याला दोन पैलू आहेत. जेव्हा डोक्यात बरेच विचार असतील तेव्हा मेकॅनिकल रियाझ करा पण जर मोकळे आहात तर बौद्धिक रियाझ करा. असा बौद्धिक रियाझ करताना मग तुम्हाला तंबोऱ्याची गरज असतेच असं नाही.

**प्रश्न : तुमच्या आयुष्यात Turning point कधी आला ज्यामुळे तुम्ही शिक्षणाबरोबरच संगीत क्षेत्रातही करिअर करायचं ठरवलंत?**

अश्विनीताई : माझं सगळं शिक्षण पूर्ण झाल्यावर, मी तिशीत असताना, माझ्या मनात विचार आला की आता माझं सगळं लौकिक शिक्षण पूर्ण झालेलं आहे व मी इतकी व र्षे संगीताचं शास्त्रोक्त शिक्षणही घेतलंही आहे तर यात मला स्वतःला काही करता येतं का? जीवनशैलीचा भाग होणं आणि फक्त तेच करणं या वेगळ्या गोष टी आहेत. फक्त तीच गोष ट करायची हा विकल्प जेव्हा आपण स्विकारतो तेव्हा तो भावनिक व बौद्धिक पातळीवर समाधानकारक आहे की नाही हे स्वतः अनुभवल्याशिवाय कळत नाही आणि मला हेच करून बघायचं होतं. मग PhD झाल्यावर मी एका व र्षासाठी हे चालू केलं अन् ते अजूनही, २० व र्षांनंतरही, चालूच आहे. यासाठी मी देवाची शतशः आभारी आहे. कारण मला जर ही वाट दिसली नसती तर मला संगीत इतकं रोमांचकारी वाटलंच नसतं.

**प्रश्न : तुम्हाला संगीत शिकताना विज्ञान शिकत असल्याचा फायदा झाला?**

अश्विनीताई : हो! मला वाटतं की तो दोन्हीकडे होतो. एकतर संगीतामधे अशा बऱ्याच गोष टी आहेत ज्याचा 'का' असा विचार केलेला नसतो, हा प्रश्नच विचारलेला नसतो कोणी. शिकायची पद्धतच हीच की तुम्ही गुरू सांगतील ते आणि तसंच गायचं. पण 'का' हाच प्रश्न विज्ञानात पहिला विचारला जातो. आता रागात 'सा रे ग म प ध नी सा' मधे येणारा शेवटचा स्वर हा परत 'सा'च का

असा प्रश्न विचारण्याची मुभा संगीत शिकणाऱ्यांना नसते. पण विज्ञानात शिक्षण घेतल्याने त्या 'का' प्रश्नाचं उत्तर समझलं. गाताना एकाच व्यक्तीला हे दोन स्वर एका वेळी गाणं शक्य नाही. पण समझा मी पहिला 'सा' गातेय व माझ्याबरोबर दुसरी व्यक्ती शेवटचा 'सा' गातेय तर हे दोन भिन्न वाटणारे स्वर इतके समरूप होऊ शकतात की ते वेगळे आहेत असं वाटतच नाही. ते एकमेकात इतके समरूप होण्याचं कारण असं की एकाची वारंवारता (Frequency) दुसऱ्याच्या दुप्पट आहे. त्यामुळे एका सप्तकातला 'सा' दुसऱ्या सप्तकातल्या 'सा' शी कनेक्ट होऊ शकतो, हे या मागील शास्त्रीय कारण आहे.

**प्रश्न : संगीत क्षेत्रातले तुमचे आदर्श कोण?**

अश्विनीताई : मी आधी अशा परिस्थितीत होते की एक नाव सांगू शकायचे, पण आता ती स्थिती गेली आहे. मी पहिले माझ्या गुरूंना ऐकते, त्यानंतर माझ्या घराणातल्या माझ्या वडीलधाऱ्यांना ऐकते. किशोरीताई, केसरबाई, मोगुबाई, मल्लिकार्जुन मन्सूर, अमीरखाँ साहेब यांना ऐकते. मी जुनं फार ऐकत नाही, मी सध्याच्या गायकांना जास्त ऐकते. त्यांमध्ये राशिदखाँ, राजन-साजन मिश्रा, उल्हास कशाळकर आहेत.

**प्रश्न : इतर वैज्ञानिकांची चरित्रं उपलब्ध असुनही तुम्ही 'मादाम क्युरी' यांचच पुस्तक का अनुवादीत केलंत?**

अश्विनीताई : पहिली गोष्ट म्हणजे, मी एखादया वैज्ञानिकाचं पुस्तक अनुवादीत करावं म्हणून हे केलं नाही, तर मी हे इंग्रजी मधील तिच्या मुलीने, ईवने, लिहिलेलं पुस्तक जेव्हा कॉलेज मध्ये असताना वाचलं, तेव्हा त्या पुस्तकाने मला भुरळ घातली. त्या पुस्तकात केवळ मेरी क्युरी बद्दल वैज्ञानिक गोष्टी दिल्या नाहीत, तर त्यांच्या नोबेल पारितोषिक मिळण्याच्या आधीचे कष्टही अप्रतिम वर्णिले आहेत.

क्युरी दाम्पत्य किती महान होतं हे ही या पुस्तकात दाखविले आहे. त्यांनी विज्ञानातल्या एका अतिशय क्रांतिकारी औषधाचा शोध लावला तरी, 'मानवाचं कल्याण होणार असेल तर त्याचं श्रेय आम्ही का घेऊ?' म्हणून त्यांनी आपला शोध आणि ज्ञान जगाला मोफत उपलब्ध करून दिलं. या विलक्षण पुस्तकाची प्रत माझ्याकडे नसल्यामुळे, मी शोधत असताना २०१० मध्ये मला ती amazon.com वर मिळाली. तेव्हा परत वाचल्यावर माझ्या हे लक्षात आलं की या पुस्तकाने जी जादू २५ वर्षांपूर्वी केली होती ती अजिबात कमी झाली नाही. मग केवळ मला मराठीतून वाचावसं वाटलं म्हणून मी त्याचं भाषांतर केलं. मी जर काही छान वाचलं तर, माझी अशी सवय आहे की, मी ते माझ्या भाषेत लिहून काढल्याशिवाय मला चैन पडत नाही. आणि या वेळी मात्र मी छोटं संक्षिप्त लिहून थांबले नाही. शब्दन् शब्द, पानन् पान अनुवाद केला. माझ्या जवळच्या लोकांनी तो वाचून मला ते प्रकाशित करण्यास प्रवृत्त केलं. म्हणून ते प्रकाशित झालं. मादाम क्युरी यांचे शैक्षणिक व वैज्ञानिक प्रेरणास्थान त्यांचे वडील होते. आणि मलाही माझ्या वडिलांकडून खूप शिकायला मिळालं. या मूळ पुस्तकाची लेखिका ईव ही सुध्दा एक संगीतकार होती. त्यामुळे ते पुस्तक लिहिताना मला असं वाटलं की त्या दोघींशी माझी नाळ जुळत आहे. त्या पुस्तकाच्या गाभ्याने माझं अंतःकरण भरून आलं.

**प्रश्न : तुम्ही बाहेर जाऊनही प्रयोग केले आहेत, तर त्यातील तुमची एखादी अविस्मरणीय आठवण कोणती?**

अश्विनीताई : मी २००८ मध्ये साल्सबर्गला गेले होते. दर वर्षी तिथे International Music Festival होतो जुलै महिन्यात, त्यांच्या उन्हाळ्यात. त्या वर्षी या फेस्टिवलच्या ऑर्गनायजरने मला बोलावलं होतं. त्याच्या आधीच्या वर्षी एका कार्यक्रमात मी त्यांना पॅरीसमध्ये भेटले होते. तेव्हा मी बोलता बोलता असं म्हणाले की भारतीय संगीत निसर्गाच्या सान्निध्यात अधिक खुलून येतं. आणि आश्चर्य म्हणजे हे त्यांनी मनावर घेतलं व अगदी सुंदर theatre असतानाही माझा कार्यक्रम त्यांनी एका डोंगरावर असलेल्या restaurant terrace वर करायचा ठरवला. कोपऱ्यात स्टेज बांधलं होतं आणि असं की त्याच्या पाठीमागच्या डोंगराच्या मागून सुर्योदय होणार होता. आणि आदल्या दिवशी फक्त ५४ तिकिटं विकली गेली होती. पुढच्या दिवशी कार्यक्रम होता सकाळी ५ वाजता. एवढी थंडी असुनही त्या दिवशी ते ठिकाण संपूर्ण भरून गेलं. त्या २५० हून जास्त माणसांमधील फक्त ३ भारतीय होती, ज्यातील २ म्हणजे भारतातील ऑस्ट्रीयातील दूत आणि त्यांची पत्नी. थंडीने पेटी-तबला वाजवणाऱ्यांची बोटं थंड पडली. माझा आवाजही बसला गाताना. टेकडी असल्यामुळे खालच्या शहरांमधील चर्च आणि मनोरे दिसत होते. ७.३० ला वगैरे माझं गाणं संपलं आणि मी तंबोरा खाली ठेवला. बरोबर त्या वेळेला त्या सगळ्या चर्चमधून एकत्र घंटांचे आवाज आले. तो अनुभव विलक्षण आणि कधीही अंगावर शहारे आणणारा आहे.

**Rapid fire**

**आवडते संगीतकार :** एस.डी.बरमन.

**आवडता राग :** भिमपलासी

**संगीत व्यतिरिक्त छंद :** लिखाण आणि वाचन.

**पुढच्या जन्मी कोण व्हायला आवडेल:** मला अश्विनी व्हायला नक्कीच आवडेल. कारण मलाही उत्सुकता असेलच ना मी कोण होणार आहे ते!

# वाट

# १

गार्गी देशमुख
द्वितीय वर्ष, विज्ञान

अशीच वाट बघत मी अंगणात बसले होते.
पण कोणी आलंच नाही, ना कोणाच्या येण्याचा इशारा
ना कसली चाहूल, ना काही खूण
अगदी सुनंसुनं वाटायला लागलं मग
कोणीतरी खूप काही बोलणार होतं,
ते कोणीतरी आलच नाही अजून
वाट पाहून पाहून थकून भागून गेले मी.
पण एक अनोळखी भावना होती मनात,
भीतीची. खोटं वाटत होतं, पण भीतीच होती ती.
कारण मी कोणाची वाट बघत होते,
तेच मुळात मला माहीत नव्हतं.
माझं मन समजणारी व्यक्ती,
अगदी प्रेमाने जवळ घेणारी व्यक्ती
काहीही, अगदी काहीही झालं तरी साथ सोडून न जाणारी
कडाक्याचं भांडण होऊनही आपली वाटणारी,
थोडी रागीट, थोडी नाठाळ, पण खूप हुशार
खूप प्रेमळ, खूप शूर, पण थोडी भित्रट.
कधी माझे प्रश्न सोडवणारी, तर
कधी मलाच प्रश्न करणारी.
सगळ्यांची लाडकी पण तेवढाच द्वेष घेणारी
शुन्यात सामावणारी पण क्षितीज नसणारी
अनंत, अपार अशी ती व्यक्ती,
अरे!.. आता उमगलं मला, ती आली होती, आताच.
माझीच वाट बघत मी अंगणात बसले होते.

# बालपण हरवतंय

१७

शांभवी मोरे
एफ. वाय्. जे. सी., कला

काही दिवसांपूर्वीची गोष ट. ट्रेनमध्ये माझ्या समोरच्या सीटवर एक बाई आपल्या ४५ व र्षांच्या चिमुरड्याला घेऊन बसली होती. तो लहानगा आपल्या आईच्या कुशीत अगदी निवांत झोपला होता. काही वेळाने तो उठला आणि उठल्या उठल्या त्याने एकाएकी भोकांड पसरलं. त्याच्या आईने त्याला शांत करण्यासाठी बरेच प्रयत्न करून पाहिले. पण तो काही शांत होईना. मग शेवटी तिने तिच्या पिशवीतील मोबाईल काढून त्याच्या हातात दिला आणि तो लगेच गप्प झाला. आपल्या आईने सुरू करून दिलेला कुठलासा गेम खेळण्यात तो इतका तल्लीन झाला की त्याला सभोवतालच्या जगाचा जणू विसरच पडला. पण त्याच्या आईच्या चेहऱ्यावर मात्र आपल्या मुलाला शांत करण्यासाठी आपण नुकताच एक रामबाण उपाय शोधल्याचा अभिमान झळकत होता.

हे सारं शांतपणे पाहिल्यावर माझ्या मनाला एका वेगळ्याच प्रश्नाने ग्रासलं. इतक्या लहान वयात तो मुलगा ज्या तऱ्हेने मोबाईल हाताळत होता याचं कौतुक करावं की मोबाईलमुळे तो त्याच्या बालपणातील मौज तर हरवणार नाही ना याची चिंता करावी? काही व र्षांपूर्वी, ट्रेनमधून प्रवास करताना, फक्त खिडकीतून बाहेरचं बघायला मिळावं म्हणून आम्ही झटायचो. पण आज मात्र त्या मुलाला या गोष टीत कोणतेच कुतूहल वाटत नसल्याचं जाणवलं. आता याला 'जनरेशन गॅप' म्हणावी की 'मोबाईलची किमया'?

अगदी ४५ व र्षांपूर्वीची गोष ट. त्यावेळी मोबाईल नव्हते अशातला भाग नाही पण ते यंत्र आमच्या हातात नव्हते तेव्हा शाळेतून आम्ही एकदा का सुटलो की दप्तर घरी ठेऊन थेट मैदानाकडे पळायचो. मग दुपारचं ऊन किंवा पोटातली भूक या कशाचीही पर्वा नसायची. त्या भर उन्हात कपाळावरचा घाम टिपत आपण जणू आपल्या कॉलनीतील सचिन तेंडूलकरच असल्याच्या ऐटीत बॅटींग केली जायची. त्यातपण ज्याची बॅट त्याची बॅटींग हा एक अलिखित नियम. हा नियम कोणी मोडण्याचा प्रयत्न जरी केला की मग भांडणाला तोंड फुटायचं.

खरी मजा असायची ती सणांच्या दिवसांत. त्यातही दिवाळीची निराळीच गंमत. किल्ला बनवणं हे आमच्यासाठी महत्त्वाचं काम असायचं. त्यासाठी खूप मेहनत घेतली जायची. कोणता किल्ला बनवायचा इथपासून ते तो बनवण्यासाठी कोणी, कुठून आणि किती सामान आणायचं या सगळ्याचं व्यवस्थित प्लॅनिंग केलं जायचं आणि किल्ला बांधायच्या कामात आम्ही रमायचो. दिवसा किल्ला बांधायचा आणि संध्याकाळी घरी चिखलाने, मातीने माखलेल्या कपड्यांनी घरी गेल्यावर आईचा ओरडा खायचा हा आमचा दिनक्रम ठरलेला असायचा. पण एकदा का तो किल्ला बांधून झाला की प्रत्येकाला आपणच त्याचे किल्लेदार आहोत असे वाटायचे. मग दिवाळीत घरी येणाऱ्या प्रत्येक पाहुण्याला आवर्जुन तो किल्ला दाखवला जायचा.

पण आता? इतक्या लहान वयात मोबाईलमध्ये मग्न झालेला हा चिमुकला पुढे जाऊन या सगळ्या गंमतींचा आनंद घेऊ शकेल? की तो फक्त आपल्या कॉंप्युटर आणि मोबाईलच्या स्क्रीनवर चिकटून राहण्यातच आनंद मानेल? मोबाईलवरील गेम्स् यांना आपले खेळ व फेसबूक वा तत्सम गोष टींवरील फ्रेंडलिस्ट यांना आपले सवंगडी मानतच तो आपलं सारं बालपण घालवेल की काय अशी शंका मनात येते.

आधुनिक तंत्रज्ञान त्याला हे असले डिजीटल व व्हर्च्युअल खेळ व संवगडी पुरवण्यात यशस्वी झालेले असले तरीही हे तंत्रज्ञान, कॉलनीत दंगा घालणाऱ्या मुलांना 'काय गोंधळ चाललाय? पळा आपापल्या घरी' असं म्हणून दामटवणारे ते खडूस काका देऊ शकेल का?

त्या मुलाला त्या वयातही मोबाईल वापरता येतो ही कौतुकास्पद बाब आहे खरी, पण या नवीन तंत्रज्ञानाच्या आहारी न जाता त्याने आपल्या सभोवताली असलेल्या जगाशी नातं जोडायला, आपल्या बालपणातील आनंद लुटायलादेखील शिकावं. हे शिकवण्याचं काम मात्र आपल्या मुलाला मोबाईल देऊ करणाऱ्या आईपासून सुरू होणं आवश्यक आहे.

# गोंडस गोष्टी

# ११

प्रतिक मोरे
द्वितीय वर्ष, विज्ञान

**घर बदलताना ..**
मला धूळीत माखलेली एक वही सापडली.
खूप जुनी दिसणारी ती, मला ओळखीची वाटली.
मी तिला हातात घेतले आणि काहीच क्षणात
डोळ्यात अश्रू आठवणी घेऊन आल्या;
आणि मन हसून म्हणालं,
'माझं बालपण!'

**प्रेमाचं वेड विचित्रच असतं.**
त्यानं खाणंपिणं जणू बंदच केलंय असं वाटलं,
पण का कोणास ठाऊक
त्याचं हृदय त्या पुस्तकांमधे किती गुंतलेलं.
त्याचा दिवस त्यांच्याशिवाय जातच नसायचा,
जणू पुस्तकं त्याच्याशी बोलायची.
त्याचं पुस्तकांवर प्रेम आणि शिक्षणाची आवड भलतीच होती.
खरंच विचित्र असतं हे प्रेमाचं वेड!

**ती निघून गेली..**
आणि तो एकटाच राहिला.
पण पावसांच्या सरींनी त्यांना एकत्र ठेवलेलं.
ढगांचा कडकडाट त्यांना आज पण
एकमेकांची आठवण करून देतो.
असं प्रेम.. किती सुंदर असत नाही!

# अनुभवाची शिदोरी

# १२

अक्षया मालगुणकर
प्रथम वर्ष, विज्ञान

निर्णय चुकतात आयुष्यातले

आणि आयुष्य चुकत जाते.

प्रश्न कधी कधी कळत नाही

आणि उत्तर चुकत जाते.

सोडवताना वाटतं सुटत गेला गुंता

पण प्रत्येकवेळी नवनवीन गाठ बनत जाते.

दाखविणाऱ्याला वाट माहीत नसते,

चालणाऱ्याचे ध्येय मात्र हरवून जाते.

दिसतात तितक्या सोप्या नसतात काही गोष्टी

म्हणूनच तर 'अनुभवाची शिदोरी' भरत जाते.

# पावसाच्या सरी

१३

मरिया इडशेरी
एस. वाय्. जे. सी., कला
(भाषांतरित)

आपला स्कर्ट सावरत ती वेगाने पायऱ्यांवरून उतरली. पैंजणांची छुमछुम आणि तिच्या हास्याची खळखळ एकरूप झाली होती. शेवटच्या पायरीवर पोहोचताच तिने गडद आभाळाकडे पाहिले, आणि पावसाच्या पहिल्या थेंबाने तिच्या गालावर स्मित उमटवले. क्षणार्धात टप टप पडणाऱ्या पावसाने जोर धरला तशी तिने चिंब होत आनंदाने एक गिरकी घेतली. सरींच्या तालावर नाचत नि डबक्यातील पाणी उडवत, तिचा किलकिलाट सर्वत्र घुमू लागला. आपल्या चिमणीला अंगणात असं पावसाच्या सरीत नाचताना पाहून तिची आई स्वतःच्या अंतर्मनात हरवून गेली. लहानपणीचा तो उत्साह, ते कुतूहल, सारं काही तिच्या डोळ्यांसमोरून आपसुकच सरकत गेलं. 'प्रौढ' होण्याच्या नादात तिचा तो उत्साह मागे राहिला होता का? "माझ्या चिमुकली सारखंच मला या वयातही माझा आनंद व्यक्त करता येईल? अगदी बालपणीसारखा? लोकांचा विचार न करता, काही क्षणांसाठी का होईना, पण माझ्यात दडलेल्या लहान मुलीला मी पुन्हा पावसात मनमुराद नाचू देऊ शकेन?" तिच्या असंख्य प्रश्नांचं "नाही", हे एकच उत्तर तिला तिच्या बुद्धीने दिलं. "मोठी होण्याच्या प्रक्रियेत मी हा अधिकार गमावून बसलेय." बुद्धीचे मत न जुमानता मनाने मात्र वेगळाच कौल दिला. साडी सावरत ती ही आपल्या मुलीच्या पावलांवर पाऊल टाकत सरींचा आनंद लुटायला घराबाहेर पडली. त्या दिवशीच्या पावसाने त्या छोट्याश्या मुलीला आपल्या आईमध्ये एक मैत्रीण मिळवून दिली.

# शाळेतील छोटेखानी जग

१४

मृण्मयी पाथरे
एस. वाय्. जे. सी., कला

शाळा म्हटलं की आठवतो तो विविध झाडांनी नटलेला परिसर, टुणटुण उड्या मारत सैरावैरा पळणाऱ्या चिमुकल्या खारुताई, विस्तीर्ण मैदानावर गुलमोहराचा पडलेला सडा आणि मिनिटा मिनिटाला बकुळीच्या फुलांचा वाऱ्याच्या झुळूकेसह आसमंतात दरवळणारा सुगंध! किती रम्य होते ते दिवस! त्याबरोबर आठवतात काही गमतीशीर घटना. अगदी बोबडं बोलता येत असतानाच मी नर्सरीत पहिलं पाऊल ठेवलं. परवाच बालवाडीतलं प्रगती पुस्तक हाती आलं आणि मी त्या वयात काय बरं करत असेन, असं म्हणून कुतूहल चाळवलं गेलं. मटार सोलता येतात, मूग निवडता येतात, बादलीत पाणी न सांडवता भरता येतं, कामाच्या वेळी अखंड बडबड सुरू असते, बोलणं जास्त आणि काम कमी, असे शेरे वाचून हसावं की रडावं हेच समजेना. आमच्या बालवाडीच्या शिक्षिका आम्हाला काही शिकवू पाहत होत्या की घरची कामं आम्हाला सांगून स्वतःवरचं ओझं हलकं करत होत्या, हे अजुनही पडलेलं अनुत्तरीत कोडं आहे. त्या प्रगती पुस्तकात या व्यतिरिक्त आम्हा मुलांच्या इतर गुणांबद्दल आणखी कोणतेही शेरे नसल्याने आम्ही बालवाडीत मुख्यतः 'काय' शिकलो हे वेगळं सांगायला नकोच. असो. पण त्यामुळे 'गृहकृत्यदक्षते'ची ओळख आम्हा निरागस मुलांना त्याच वयात झाली, हेही नसे थोडके!

पुढे मोठ्या शिशु वर्गातून पहिलीत जाताना एक भलं मोठं संकट उभं ठाकलं. प्राथमिक शाळेत प्रवेश घेण्यासाठी एका मुलाखतीला सामोरं जावं लागणार होतं. एवढ्याशा चिमुरड्यांसाठी ही सोपी गोष्ट म्हणून की काय पुढे अजून एक प्रवेशपरीक्षा घेण्याचं जाहीर केलं. अखेर मुलाखतीचा दिवस उजाडला. आम्हा साऱ्यांना शिस्तीत एका हॉलमध्ये बसवलं आणि एकेकाला मुलाखतीसाठी वर्गामध्ये सोडण्यात येत होतं. जेव्हा त्या वर्गात जायची माझी पाळी आली तेव्हा अक्षरशः अंगावर काटे उभे राहिले होते. सारा धीर गोळा करून मी आत गेले तर आत दोन प्रसन्नमुखाने हसणाऱ्या शिक्षिका माझ्याकडे पाहात होत्या. तेव्हा कुठे जरासं हायसं वाटलं. माझ्या पाठोपाठ अजून एक वर्गमैत्रिण त्या वर्गात आली. आपल्या सोबत कोणीतरी ओळखीचं आहे या भावनेनेच माझं बालमन सुखावून गेलं. पण काहीच वेळात सुरू झाल्या त्या नकोशा वाटणाऱ्या प्रश्नोत्तरांच्या न संपणाऱ्या फेऱ्या. आम्हा दोघींनाही बहुतेकसाऱ्याच प्रश्नांची उत्तरं नीट देता आली (माहीत नसलेल्या प्रश्नांची असंबद्ध टोलवाटोलवी सुरूच होती.) आणि आता फक्त शेवटचा प्रश्न उरला म्हणून मी आनंदात होते. पण त्या शेवटच्या प्रश्नानेच घात केला. "तुला कोणती भाजी खायला आवडते?" असा प्रश्न जेव्हा समोरून विचारला गेला तेव्हा नुसतं ओशाळलेलं हसण्यापलीकडे माझ्या हातात काहीच नव्हतं. जवळपास सगळ्याच सामान्य मुलांप्रमाणे मलाही भाज्या खायला अजिबात आवडायचं नाही. पण या प्रश्नाचं उत्तर नाईलाजाने का होइना द्यावं लागणारच होतं आणि कोणती भाजी सांगितली तर या बाईंना अधिक ईंप्रेस करता येईल याची गणितं एकीकडे डोक्यात चालू होती. पालक ,मेथी, भेंडी, तोंडली, घेवडा यांचा विचार जरी केला तरी कसनुसंच वाटत होतं. सरतेशेवटी बटाटा हे उत्तर देऊया म्हणून निश्चित केलं पण 'बटाटा' या बाईंवर काही चांगला प्रभाव पाडणार नाही म्हणून मेंदूने सतर्कतेचा ईशारा दिला. आता करावं तरी काय? इतक्यात माझ्या वर्गमैत्रीणीलाही तोच प्रश्न विचारला आणि तिने "मला शेपू आवडते" असं चटकन उत्तर दिलं. मग माझे डोळेही आशेने चमकले. मी सुद्धा "मलाही शेपू आवडते" असं सांगितलं. दोन्हीही बाई खुदकन हसल्या आणि डोळे मिचकावत "छान! अशाच भाज्या खात जा, आता पळा, पुन्हा भेटू!" असं म्हणाल्या. हे नसतं दिव्य पार बुवा असं मनाशीच बोलून बाहेर पडले . पुढे मला त्या प्राथमिक शाळेत प्रवेश मिळाला. पण ती शेपूची भाजी अजुनही आठवते. ती भाजी कशी असते, कशी दिसते, तिची चव कशी असते हे मला अजुनही माहीत नाही. पण त्या वेळेस तीच भाजी माझी तारणहरती होती.

तिसरीत असताना आम्हाला एक मध्यमवयीन शिक्षिका गणित शिकवायच्या. फळ्यावर गणितं लिहिली की या बाईंचं काम संपायचं आणि त्या बसल्या जागेवरच निद्राधीन व्हायच्या. बसल्या बसल्या झोप यावी म्हणून चंदन, जास्वंद, गुलाबपाणी असं बरच काही चेहऱ्याला लावून झोपायच्या. त्यामुळे वर्गभर घमघमाट सुटलेला असायचा. असंच एके दिवशी त्यांनी आम्हाला गणितं फळ्यावर लिहून दिली आणि 'ती सोडवून झाली की तपासण्यासाठी माझ्याकडे या' असं फर्मान सोडलं. आम्ही सगळ्यांनी गपगुमान सगळी गणितं सोडवली आणि आमच्या गुरूंची झोप कधी पूर्ण होते याची प्रतिक्षा करत बसलो. थोडा वेळ गेल्यावर वर्गात चुळबूळ सुरू झाली. ज्यांची गणितं सोडवून झाली होती ते बाईंपाशी रांग करून उभे राहिले. तरी त्यांचे डोळे उघडायचं नाव घेईनात. अखेरीस बाईंनी थोडेसे डोळे किलकिले केल्यावर एका मुलाने थेट त्यांच्या समोरच वही आपटली. त्या खडबडून जाग्या झाल्या आणि आळसावलेल्या हाताने कशीबशी वही तपासली. मी पण माझी वही घेऊन पुढे सरसावले तर बाईंना परत डुलकी लागली. आम्ही सगळेच खुदूखुदू हसत होतो. डुलकी काढता काढता त्यांचं डोकं पाठीमागच्या फळ्याला लागलं आणि त्या परत खाडकन जाग्या झाल्या. पण या वेळेस फिदीफिदी हासणाऱ्या आम्हा सर्व मुलांकडे त्या डोळे वटारून पाहात होत्या आणि अचानक त्यांनी मला चापटी मारली. मी गांगारले. "हे काय भलतचं गणित केलंयस? असं शिकवलं मी तुम्हाला?" इति त्यांचा रुद्रावतार. माझं गणित तर अचूक होतं. हे मला माहीत होतं पण एकही अवाक्षर न काढता मी चुपचाप माझ्या जागेवर जाऊन बसले. त्या झोपेत होत्या हे त्यांच्या जास्वंदाने रंगवलेल्या मुखकमलाकडे पाहून कोणालाही कळलं असतं. माझ्या एका मित्राने त्यांना जागं करायची एक नामी युक्ती शोधून काढली होती. "बाई, फळ्यावर पाल आहे! उठा! उठा!" असं हा पठ्ठ्या बोंबलायला लागला आणि बाई खडबडून जाग्या झाल्या. हे सारं इथपर्यंतच थांबलं नाही तर त्या गडबडीत बाईंचा खुर्चीवरून तोल जाऊन त्या जमीनीवर धप्कन आपटल्या. सगळा वर्ग खोखो हसत होता. मात्र एकही जण त्यांना उचलायला पुढे आला नाही. पण पुढे याची परिणीती संपूर्ण वर्गाच्या शिक्षेत झाली. तेव्हापासून आम्ही सर्वांनीच कानाला खडा लावला आणि या पुढे कोणत्याही शिक्षकाची खोड काढायची नाही असं मनोमन पक्कं केलं.

पुढच्या शालेय जीवनात मला अनेक शिक्षक भेटले. त्यापैकी एक जण तर भूमिती शिकवायचं सोडून फळ्यावर भलतेच सुविचार लिहीत बसायचे. एकदा तर त्यांनी कळसच केला. "Going on date isn't a good thing to do at your age, but eating dates is!" असा विचित्र 'सुविचार' लिहून आमच्या कुमारमनावर अप्रतिम संस्कार रुजवले. पण या गोंधळात आमच्या भूमितीचा बट्याबोळ झाला याचं त्यांना तसूभरही काही वाटलं नाही. असो . पण आईसारखं प्रेम देणाऱ्या मराठीच्या वर्गशिक्षिका, चित्रकलेतून रंजक कल्पकतेचे विश्व खुलं करणाऱ्या कलाशिक्षिका, मुलीसारखे लाड आणि कोडकौतुक करणारे सर, मुंबईतील सर्वोत्कृष्ट संस्कृत अध्यापकांमध्ये गणना केली जात असतानाही 'हा जन्म सारं काही जाणून घेण्यासाठी अपूरा पडला गं!' असं म्हणताना डोळ्यात दाटलेले अश्रू लपवण्यासाठी प्रयत्न करणारे माझे आदरणीय गुरु आठवतात. माझ्यासाठी शाळा ही कधीच एक संस्था नव्हती. ते माझं कुटुंब होतं. प्रत्येक गोष्टींमध्ये शाळेतील शिक्षकांचाच काय पण शिपाई काकांचा मिळणारा पाठिंबा किती अनमोल होता हे आता या मोठ्या जगात स्थिरस्थावर होण्यासाठी झटणाऱ्या या छोट्याशा जीवाला कळतयं. कोडकौतुकासोबत अनेक प्रसंगी हक्काने कान पिळून दटावणारे शिक्षक आठवले की कृतज्ञतेची भावना मनात आपसूकच निर्माण होते. अत्यंत तळमळीने पाठ्येतर अंश शिकवणाऱ्या शिक्षकांचा आणि शिक्षण पद्धतीतील वैविध्यपूर्ण प्रयोग करण्यासाठी नावाजल्या जाणाऱ्या शाळेचा मला सार्थ अभिमान आहे.

# पाऊल न वाजवता!

१५

समीहा सबनीस

एफ. वाय्. जे. सी., कला

शेवटी एकदाचं दुर्गानं खाटेवर अंग टाकलं. पण झोप मुळी येत नव्हती. दंडावरच्या जखमेवर दाबलेली हळद बोचत होती. कूस बदलताना पोटात गोळा येत होता. पापण्या एकमेकांना भेटत नव्हत्या. वर पाहावं तर गळक्या छपरातून फाटकं आकाश दिसत होतं. एवढ्यात तिला एक हाक ऐकू आली.

"माऽऽय"

एक आर्त हाक. एक उदास हाक. खिडकी बाहेर वाऱ्याने मोठ्ठा उसासा टाकावा तशी, वाऱ्यासारखीच क्षणात विरणारी हाक.

"ऐ माय! निजलीस कागे? बघ, पुना झोपेतून उठवलेनी म्या तुले. लय छळतीना म्या तुले. लय तरास देती, लय दमिवती. तुए संसाराले लय वझं देती. अश्शीच ए म्या. लय वाईट हाय म्या. नकुच्चे म्या तुले. अगे तुए सारे मायचे कुशीत कुनी राजकुमार खेळावा, मये सारी चांडालीन न्हाय. कश्यापाये पायजेल म्या तुले? त्या ग्रामशेविका ताए बोलत्याय म्हून? उगाच? उगा खायले काळ न भुईले भार.

"श्याना मये बाप त्यो, तुले दवाखान्यात गेऊन गेला व्हता. कश्यापाये न्हाय म्हनलीस? कशाले कोयता उगारलास? वैद्य बोललेलं न बापाले 'सारं काय पाऊल न वाजवता हुईल' अन् एकदाचे म्या निपटून जाएल. कश्यापाये पळून आलीय तिथून? उगा तू बी दमली न मला बी दमिवलं.

"अगे कई समजत न्हाय तुले. ह्या जगाले फकस्त बापे पायजेल. ह्या जगाले गरज न्हाय मयी. अगे मले जलम नकू देवू माय. तुया जगात इऊन मया जलम वाया जाएल. तुया परी रोज मरन्यापरीस आताच संपवून टाक मले.

"अगे मले काय जगात रहाचं न्हाय? मले काय कळी फुलताने, आकाश फाडून पाऊस पडताने, सूर्य उगिवताने पहायचं न्हाय? मले बी रानात जायचं हाय, गायचं हाय, नाचायचं हाय, जगायचं हाय.

"पन वर बघ माय, निसतं फाटकं आकाश दिसंल, पाऊस दिसनार न्हाय. कुसकरलेली कळी दिसंल, फूल गावायचं न्हाय. निसती काळोखी रात असंल, सूर्य उगिवनार न्हाय.

"बाप इकून खाएल, नवरा लाथाडेल, पोरं मागं वळून पाहनार न्हाय. निसती फुंकणी बनून न्हाएल म्या. कुनी बी यावं न जाळ काढावा.

"आता तू किती बी रडलीना तरे या खाटेपरी कुनाला बी ऐकू जायचं न्हाय. पर जवा दादाले बायकू मिळायची न्हाय, सागराले नदीच उरायची न्हाय, भवऱ्यापाय कळी उमलायची न्हाय, ह्या जगात पोरगीच उरायची न्हाय तवा तू न्हाय बी वरडलीसना तरी बी जगाले कान फाटेस्तो ऐकू जाएल. पन आता मले नकू या वाळवंटात आनू."

दुर्गा धासकन उठली. पोटात जणू ढवळून निघालं. तिनं घोंगडी घेतली. कापड जोडी घालून आपलं गाठोडं बांधलं. आपल्या झिंगलेल्या नवऱ्याला बाजुला केलं आणि उंबऱ्यापार गेली. निघाली पहाटेच्या दिशेनं पाऊल न वाजवता..!

# मोकळे व्हा एका दिवशी

आपापल्या बंधनात गुंतले आहात सगळे

मोकळे व्हा तरी एका दिवशी

मित्रांबरोबर फिरायला जा, सिनेमा बघा

स्वतःला वेळ द्याना एका दिवशी,

अभ्यास, व्यवसाय, घरदार; फक्त याच नाहीत तुमच्या सीमा

कला, क्रिडा, खेळ, यांचा पण आनंद घ्या की एका दिवशी.

लोकांचं ऐकून ऐकून दमले असाल, तर मनाचं पण ऐका एका दिवशी

पैशांच्या आधी जीवनाचा स्पर्श घ्या एका दिवशी.

आभाळाची दृष्    टी बघून मोठा श्वास घ्या एका दिवशी,

आपल्याबद्दल विचार करा एका दिवशी.

तरच अडकलेल्या प्रश्नांची उत्तरं मिळतील;

मोकळे व्हा एका दिवशी.

१६

रश्मी सुब्रमण्यम
द्वितीय वर्ष, कला

# झेवियर्सचा प्रवास
## शोध स्वतःचा

१७

अलसोना गोम्स
द्वितीय वर्ष, विज्ञान

माणसाचं आयुष्य रहस्यमय आहे. आयुष्याच्या कुठल्या क्षणी कुठली परिस्थिती तुमच्यासमोर उभी राहील ते सांगता येत नाही. फक्त त्या परिस्थितीशी लढण्याची, झुंज देण्याची हिम्मत असावी ! आयुष्य सुंदर असतंच पण ते आपण स्वतःहून अजून सुंदर करू शकतो.

मी वसईमध्ये राहणारी एक साधी विद्यार्थिनी. वसईमध्येच बारावीपर्यंतचं शिक्षण झालं. बारावीमध्ये ८७% मिळवून आयुष्याच्या पुढच्या टप्प्यासाठी सज्ज झालेली मी! बारावीचं शिक्षण होईपर्यंतच्या आयुष्यात मी सेंट झेवियर्स कॉलेजचं नावही ऐकलं नव्हतं. मला वाटलं पण नव्हतं की मला माहीत नसलेले कॉलेजच माझ्या आयुष्याचा केंद्रबिंदू बनून माझ्या आयुष्याला एक वेगळं वळण देणार आहे.

मी आता ह्या कॉलेजमध्ये दोन व र्ष आहे, पण आजदेखील मला काही व र्षा पूर्वी पहिल्यांदा कॉलेज बघून जसा आनंद झाला होता तसाच आनंद होतो. मी माझ्या वडिलांसोबत ॲडमिशन घेण्यासाठी आले होते. त्या आगोदर मी फक्त गुगलवर माझं भावी कॉलेज पाहिलं होतं. पण त्या दिवशी प्रत्यक्षात कॉलेज बघून माझं मन गर्वाने फुलून गेलं. जुन्या काळातली ती भव्य इमारत पाहून पहिल्याच नजरेत मी माझ्या कॉलेजच्या प्रेमात पडले होते. पहिलं पाऊल टाकताच मला पुन्हा एकदा ब्रिटीशांच्या काळामध्ये असण्याचा भास झाला. कॉलेजमध्ये गेल्यावर तो खुला, मोकळा कॅम्पस बघून त्याच क्षणी मी मनात पक्क केलं होतं, "मी या मिळालेल्या संधीचं सोनं करणार!"

झेवियर्स कॉलेजबद्दल अशा अनेक आठवणी, गोष टी, शिकवणी आहेत ज्या अनंत काळासाठी माझ्या हृदयावर कोरल्या गेल्या आहेत. अशी इथे एकही गोष ट नसेल ज्यातून शिकण्यासारखं काहीच नाही. इकडचं वातावरण वसईपेक्षा फार वेगळं आहे. सुरुवातीला भीती वाटायची, मनामध्ये शंका यायची, मी जर कमी पडले तर! आणि कधीकधी तर असंही वाटायचं की मी या कॉलेजमध्ये कधीच मिसळू शकणार नाही. मनामध्ये स्वतःवि षयी कमीपणा आला होता. वसईची संस्कृती फार वेगळी आहे. कधीकधी वाटायचं आपली संस्कृती विसरून या इकडच्या मुलामुलींसारखं वागायचं. पण असं का? मग मनामध्ये निश्चय केला की, नाही, मी स्वतःची ओळख, संस्कृती बदलणार नाही. मी जी आहे, ती आहे. आणि अशीच राहून मी स्वतःचा शोध घेईन. झेवियर्सने मला शिकवलं स्वतःवर विश्वास ठेवायला.

कधीकधी असे प्रसंग आले की मला त्या लोकांपासून पळून जावसं वाटलं होतं, पण मी तुटले नाही. मान वर करून त्यांच्यासमोर उभं राहून त्यांना तोडीस तोड उत्तर देण्यास मी शिकले. जसं जसं मी या वातावरणात रमत गेले, तसं तसं मला स्वतःला, आणि माझ्या आजूबाजूच्या लोकांना, माझ्यामध्ये प्रचंड बदल झाल्याचा अनुभव झाला. काही लोकांनी त्या बदलाला प्रोत्साहन दिलं तर काहींनी मागे खेचलं. पण काहीही असो, हा माझ्यातला बदल मला नवीन वाटला आणि नवीन गोष टी शिकण्यात काही चूक नाही.

पहिल्या व र्षाच्या शेवटी शीऋचे तास पूर्ण करायचे असतात. सुरुवातीला खूप चीड आली. 'अभ्यास कमी होता का, की आता ही समाजसेवाही करायची?' पण जशी जशी मी या नवीन दिनक्रमात रमू लागले तशी तशी मला जाणीव झाली की आपण नेहमी स्वतःचाच विचार करतो. पण जीवनाचा खरा आनंद तर दुसऱ्याच्या चेहऱ्यावर हसू आणण्यात आहे.

शिक्षणाच्या दुसऱ्या व र्षी मल्हार या फेस्टमध्ये भाग घेतला. स्वयंसेवक म्हणून काम करत असताना त्या उत्साही वातावरणाचाही खूप छान व वेगळा अनुभव मिळाला.

झेवियर्सची वाट खडतर आहे. पण आयुष्यात मला एक समजलं की जर वाट सोपी असेल तर त्यातून आपले ध्येय शोधण्यात मजा येत नाही. आव्हानं आपल्या जीवनाला रोमांचक बनवतात.
जेव्हा मी त्या मोकळ्या कॅम्पसकडे नजर फिरवते तेव्हा माझ्या हृदयातून एक आवाज नेहमी माझ्या कानी येतो, "हे इतकं मोठं जग सामावून घ्यायला हे आयुष्यही पुरणार नाही!"

# प्रतिक्रिया

१८


सिद्धी देशपांडे
प्राध्यापक, कला शाखा, A.I.C


**नेहमी सामोरे येणारे माझ्या आयुष्यातले काही प्रसंग.**

बरेचदा आईबाबा किंवा दादा-वहिनी बरोबर बाहेर गेले की माझी ओळख Archaeologist म्हणून करून दिली जाते. कारण कोणाला मी भेटले तरी पहिला प्रश्न हाच असतो, "काय करते हो तुमची मुलगी/बहिण?" मग उत्तर येतं, "अहो तिने Archaeology केलं आहे!" असे म्हणताच मला फार मजेशीर प्रतिक्रिया मिळतात. भरमसाठ प्रश्न आणि ते नाही तर उपदेश.

पहिला प्रसंग

ते : काय? Archaeology? ते काय असतं?
(आता या प्रश्नाचे उत्तर देताना नेहमी मी क्षणभर श्वास घेते, आणि त्या व्यक्तीच्या प्रश्नांचा विचार करते.)
मी : पुरातत्वज्ञान.
ते : हम्.. म्हणजे त्यात नक्की काय करता तुम्ही?
मी : कामाचे मुळ स्वरूप असे की उत्खनन करून जुन्या काळातल्या वस्तु शोधतो, आणि त्यातून त्या काळाचा इतिहास समजून घेतो.
ते : हम्. वा! छान आहे हे. पण याला पुढे काही scope आहे का?
मी : तसे बरेच सरकारमान्य प्रोजेक्ट असतात. आणि अशी (Archaeological Society of India) च्या ही खूप संधी असतात.

हा तर सरळ साधा अनुभव होता, ज्यात मी समोरच्याला सांगितलं, त्याला पटलं, नाही पटलं तरी स्वतःचं ज्ञान पणाला न लावता उत्तर दिलं.

दुसरा प्रसंग

पहिला प्रश्न कायमस्वरूपी तोच असतो Archaeology म्हणजे काय?
ते : Archaeology? अच्छा.. ते ना? ज्यात उत्खनन करता तुम्ही?
मी : हो हो. तेच !
ते : छानच आहे ते!...पण scope काही आहे का?
मी : हो आहेत ना, त्यात..
ते : नाही म्हणजे नोकरी वगैरे मिळते का? कसं आहे, की शेवटी काहीतरी कमवायला पाहिजेच ना!
मी : हम्.. हो. Government चे खूप प्रोजेक्ट असतात आणि संशोधन, अध्यापनही करता येतं इथे Musuem मध्येही नोकऱ्या..
ते : अगं ते असतील गं! पण पगार कसा काय असतो? पुढे त्याचाही गांभीर्याने विचार केला पाहिजे ना!
(मला माझी वाक्यही संपवू देत नाहीत आणि त्यामुळे बोलताना आता मात्र माझा धीर सुटू लागतो. तुम्हाला काय करायचं आहे.. माझे आईबाबा बघून घेतील वगैरे.. असं बोलावसं वाटतं.. पण सरळ तोंड करून मी म्हणते)
मी : इथे विस्तारीत संधी असल्यामुळे, छोट्या वेळचे contract असतात, त्याबरोबरही परत time बऱ्याच गोष्टी करू शकतो आम्ही.

तिसरा प्रसंग

काही वेळा खरा खरा सल्लाही मागायला लोकं बोलतात, विचारतात.
ते : हो! Archaeology! माझ्या पण मुलाला/मुलीला करायचं आहे. कसं काय केलस तू?

मी त्याला/तिला तुझ्याशी बोलायला जरूर सांगेन. या क्षेत्रात scope खूप असेल ना? मी : हो! आहे ना!..मला संशोधनात रस आहे म्हणून मी ते करता करता शिकवते महाविद्यालयात. आणि वेगवेगळ्या प्रकारचं freelancing पण करता येतं.
(समोरची व्यक्ती जर मी घेतलेल्या या निर्णयावर सहमत नसेल तर असेही म्हणतात.)
ते : अगं, तसंपण मुलगी आहेस ना! हे चालायचंच. करा हौस पूर्ण!(अरे!! याचा अर्थ तरी काय? जसं काही बाकीचा कोणताही course करण्यासाठी admission form देताना त्याबरोबर एक guarantee certificate पण दिलं जातं की हे शिक्षण संपताच तुमचा job तुमची वाट बघतोय. आणि हा असातसा job नाही बरं! मोठा पगार वाला आणि मोठा हुद्देवालाही.)

हे असे प्रश्न ऐकले की मला त्यांना एक प्रश्न विचारावासा वाटतो, "मी जर उत्तर दिलं की मी Engineer, Doctor, C.A. आहे तर लोकांना कसा प्रश्न पडत नाही की 'तुम्ही नक्की काय करता?' किंवा 'त्याच्यात पुढे काही scope आहे का?' जसं काही सगळ्यांना माहीतच असतं की खरोखर या क्षेत्रात काय काय कामं करतात!"
आता मला अजून एक गंमत वाटते. मी जेव्हा तरुण Engineer, Doctor किंवा C.A. यांना भेटते आणि सांगते की मी Archaeology करत आहे, तेव्हा ते तर खूप खुष होतात. म्हणतात, "वा! काय मस्त क्षेत्र आहे! सारखं काहीतरी होत असणार! किती जागा फिरता येतात ! नवीन नवीन अभ्यास करता येत असेल ! आमचं कसलं boring आहे बुआ आयुष्य. रोज तीच ती जागा, तोच कॉम्प्युटर, आणि तोच तापदायक बॉस!"

मला ऐकून तर बरं वाटतं. पण एवढं तेजस्वी दिसतं तेवढं नाही हे. मान्य आहे की ९ ते ६ वाला job नको, एका ठिकाणी बसायला लागणार नाही म्हणून मी आधी हे क्षेत्र निवडलं होतं. पण इथेही struggle आहेच की! किंबहूना जास्तीच. म्हणा तो कुठे नसतो? पण एवढं खरं की फावडं घेऊन जुन्या जागांची माहिती काढावी लागते, स्वतः जेव्हा खणावं लागतं, तेव्हा खरंच आज्या पणज्या आठवतात.
माझ्या M.A.च्या interview च्या वेळी मला विचारले होते की तुम्हाला माहीत आहे की यात scope खूप कमी आहे. फार उत्साहाने मी उत्तर दिले होते, "हो माहीत आहे. पण माझा scope मी स्वतः तयार करेन."
आणि त्यानंतर मला आठवतं आमचं M.A. चं पहिलं lecture ज्यात पुरातत्वज्ञानातली प्रख्यात व्यक्ती आम्हाला सांगत होती की तुम्हाला archaeology मध्ये मस्त नोकरी मिळेल, खूप पैसे मिळतील; Government तुमच्या कामाची कदर करेल, तुमचं खूप नाव होईल; अशी जर तुमची समजूत असेल, संकल्पना असेल तर आजच तुम्ही admission रद्द करा. हे तुमचं क्षेत्र नाही! हे ऐकल्यावर मीच नाही तर सगळेच आश्चर्यचकीत होऊन बघत बसलो.
पण त्यांच्या बोलण्याचा अर्थ असा होता की तुम्हाला या वि षयाची खरंच आवड असेल तरंच हे करा. सगळे करतात, किंवा आकर्षक वाटत असेल तर अजिबात करू नका आणि परत यावर त्यांनी १ तासभर lecture दिलं!

पाचवा प्रसंग

जेव्हा मला नुकतीच careerचा विचार करत असलेली लोकं विचारतात, की या क्षेत्रातला scope काय आणि कसा आहे, तेव्हा मी त्यांना हेच सांगते की तुम्हाला तुमची वाट स्वतः शोधावी लागेल या क्षेत्रात. वेळ लागेल, खूप डोकेफोड होईल, चिडचिड होईल, लोकं हजार प्रश्न विचारतील, आईबाबांना पटवून द्यायला लागेल. पण तुमचा निर्णय तुमच्या मनात पक्का असेल, तर मग यशापासून कोणीही लांब ठेवू शकत नाही. आणि मग तुमचा scope तुम्हीच स्वतः तयार कराल.

# खोटं प्रेम

११

**दिनेश मोहिते**

प्रेमाला उपमा नसते,

पण ते कधीच गोड नसते.

प्रेमात सर्व काही माफ असते,

पण ते कधीच सत्य नसते.

प्रेमात प्रेम असते,

पण त्यात कधीच पारदर्शकता नसते.

प्रेम विश्वासाचे असते,

पण त्यात संशयाचे भूत असते.

प्रेम जगायला शिकवते,

पण ते कधी कधी मरणाच्या

वाटेवरसुद्धा नेवून ठेवते.

असे हे प्रेम करायचे की नाही करायचे,

हे स्वतःच ठरवायचे असते.

# शिक्षण

२०

अमेय उर्मिला शंकर खताते
द्वितीय वर्ष, विज्ञान

शिक्षणाशिवाय माणसाचं आयुष्य अगदीच अपुरं. इतिहासाने आपल्याला शिकवलेच आहे की माणसाची प्रगती अशिक्षित असल्यामुळे अडली. अनेक थोर समाजसुधारकांनी लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याकरिता अथक प्रयत्न केले. पूर्वीच्या काळात आपल्या दुर्दैवी समाजव्यवस्थेमुळे लोकांची जातीय विभागणी झाली. त्याचमुळे कदाचित शिक्षणापासून सामान्य वंचित राहिले. पुढे हळूहळू लोकांना शिक्षणाचे महत्त्व जाणवू लागले, पण ते सुद्धा नोकरी-धंद्यासाठी, आपली सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी नाही.

काळ तो कालच्या शिक्षणाचा..

१९व्या शतकात महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण हाच त्यांचा धर्म मानला. त्यांनी खऱ्या अर्थाने सर्वांना समान न्याय, हक्क आणि शिक्षण मिळण्यासाठी प्रयत्न केले. मग स्वातंत्र्याच्या लढ्यात अशा इतर शिक्षित आणि जागृत लोकांची खूप मदत झाली. स्वातंत्र्यानंतरच्या काळात सरकार व धोरणे नियमित झाल्यानंतर शिक्षणाचा हक्क व शि ष्यवृत्ती पुरवणे हेच ध्येय होते. पण त्याची अंमलबजावणी करणे आजपर्यंत कोणत्याही सरकारला जमले नाही असे जाणवते. शिक्षणावरती आपल्या देशात ५% वार्षिक सरकारी खर्च केला जातो. तो तसा अपूरा आहे पण तोही धड वापरला जात नाही. आजही लोकांना शिक्षणाचे महत्त्व तेवढे जाणवलेले नाही. तशी धोरणे अनेक होती पण ती सामान्यांपर्यंत पोहोचलीच नाहीत. ज्यांनी शिक्षण घेतले, ती घोकमपट्टी केली. प्रत्यक्ष व्यवहारिक जीवनात त्याचा फायदा केला गेला नाही. आणि केलाच तर तो स्वतःसाठी, समाजाच्या भवितव्यासाठी कमीच.

आजचे शिक्षण..

आपल्या देशातून तसे अनेक जण परदेशात शिकण्यास गेले आहेत. याचं कारण इथली व्यवस्था तशी फारशी कार्यक्षम नाही असा समज. तेथे गेल्यावर त्यांना जाणवले की तिथली शिक्षणपद्धती व्यवहारिक ज्ञान देणारी आहे. तशी आपली पद्धत पण अल्गोरिदम वर आधारित आहे. पण शेवटी इथल्या विद्यापीठांमध्ये तेवढी कार्यक्षमता नाही! आता जो तो येतो आणि आपापली शाळामहाविद्यालय काढतो, एखादं दुकान टाकावं तसं. यातील दुकानदार लोकंसुद्धा एकतर अशिक्षित किंवा राजकीय लॉबीतील मंडळी. त्यामुळे त्यांना दर्जा नको असतो फक्त डोनेशन हवं असतं. त्यात विद्यार्थी मात्र भरडले जातात. उदाहरण द्यायचे झाले तर आपली मुंबईची इंजिनीयरिंगची महाविद्यालयं. काही हातावर मोजण्याइतकी महाविद्यालये सोडली तर बाकी सर्व भकास आहेत. पोरांना ड्रॉप, केटी लागलाच पाहिजे; त्याशिवाय अर्थ नाही अशी विचित्र समजूत. हे सर्व झाले कॉलेज पातळीवर. सरकारी पातळीवर तर अजून मारामार! कॉलेजच्या तपासण्या, विद्यापिठांचे हाल तसंच फ्रीशिप, कोटा शि ष्यवृत्ती यात तर करोडोंचा घेटाळा. त्यातही कितीतरी योजना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतच नाहीत कारण कॉलेज, विद्यापीठ आणि प्रशासन यांच्यात संपर्क कमी. शिक्षण म्हणता म्हणता इतर व्यापच जास्ती आहेत. तर आता सांगा, शिक्षण कुठे राहिले! आज जे चालू आहे ते शिक्षण? पण तशा काही त्रुटी जरी असल्या तरी त्या सुधारून आपण अल्गोरिदमच्या आधारावर आपलं शिक्षण पण फलदायी करू शकतो.

उद्याचं शिक्षण..

भारतरत्न डॉ. सी. एन. आर. राव नुकतेच म्हणाले की भारतातील ९०% विद्यापीठांमध्ये कालबाह्य अभ्यासक्रम आहे. तेही खरं आहे. जग कोठे भरारी घेत आहे आणि आपण कोठे चाललो आहोत! आता मोठ्या प्रमाणात बदल हवा आहे. त्यासाठी व्यवहारिक ज्ञानावरती जोर दिला पाहिजे. कार्यक्षमता तर प्रचंड प्रमाणात वाढवली

पाहिजे. मुळात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन हवं. आपण हे का व कशासाठी शिकतो हेच त्यांना माहीत नाही. नुसती कमाई जास्त आहे म्हणून ते  शिकावे का? तर नाही. आपल्याला आपले १००% जिथे देता येईल, ते शिकावं. भारत अजून प्रगतीशील आहे व त्याच्या प्रगतीला जोर येण्यासाठी पदवीची व सुशिक्षित मेंदूची तर गरज आहेच, परंतु साक्षर व सुशिक्षित हृदयांचीही गरज आहे.

# कार्यकारिणी २०१५-१६



वैदेही राऊळ
उप सचिव



राजस शिंदे
मुख्य सचिव



वेदश्री आगाशे
उप सचिव



सिद्धेश सुर्वे
समन्वयक



प्राजक्ता सावंत
समन्वयक



दिपज्ञा वाळंज
खजिनदार




हर्षद पारेकर
संपादक



गार्गी देशमुख
सह संपादक



ऋचा देवरचेट्टी
संगीत
विभागप्रमुख



सुमेधा कुकडे
नाट्य
विभागप्रमुख



आशुमी मेहता
कला
विभागप्रमुख



प्रणीता काटदरे
साहित्य
विभागप्रमुख

मोहक केसर
जनसंपर्क
विभागप्रमुख



अबोली इंगळे
जनसंपर्क
विभागप्रमुख



मनोग्ज्ञा तुरुमेल्ला
मार्केटिंग
विभागप्रमुख



अंतरा मोने
मार्केटिंग
विभागप्रमुख



तेजस मयेकर
क्रिएटिव्हस्
विभागप्रमुख



सोहम राणे
छायाचित्रण
विभागप्रमुख